पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ५

**सभावृत्तांत**

दिनांक - ०७/०८/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. सुपे आशा रविंद्र - **सभापती**

२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू

४) मा. ननवरे जितेंद्र बाबा

या शिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा. गावडे – नगरसचिव, मा.तांबे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र. ३) BSUP-JnNURM अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पत्राशेडमधील विद्युत देयक अदा करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

----

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.शांताराम भालेकर अनुमोदक : मा.आशा सुपे

मा.शहर सुधारणा समितीची सभा गुरुवार दिनांक ०८/०८/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** मा.शहर सुधारणा समितीची सभा गुरुवार दिनांक ०८/०८/२०१३ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

(सुपे आशा रविंद्र)

**सभापती**

मा.शहर सुधारणा समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक ५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०७/०८/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - ०८/०८/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक ०७/०८/२०१३ ची तहकूब सभा गुरुवार दिनांक ०८/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र- **सभापती**
२) मा. सौ.साळुंखे सविता सुरेश
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
४) मा. तानाजी विठठल खाडे

या शिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा. गावडे – नगरसचिव, मा.तांबे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

दिनांक १७/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र. ४** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - १
दिनांक - ०८/०८/२०१३ विभाग – क प्रभाग
सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंखे
संदर्भ : मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील जा.क्र. कप्रस/सभा/११/कावि/१५७/२०११, दि. २४/१०/२०११

मा.क प्रभाग समिती सभा दि.७/९/२०११ ठराव क्र.४२ नुसार प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्र लगतच्या निवासी विभागासह यापूर्वी मनपाचे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे - बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे

क्षेत्र प्राधिकरणने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. या ठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणाकडे गेल्यास क्षेत्र मनपाचे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी मनपाकडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने मनपा मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते मनपाचे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस असली तरी सदरचा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत तपासणी व आवश्यक दुरुस्त्यांसह फेरप्रस्ताव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा अशी शिफारस मा.महापालिका सभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ | विषय क्रमांक - २

दिनांक - ०८/०८/२०१३ | विभाग – वाहतूक नियोजन कक्ष

सूचक – मा.शांताराम भालेकर | अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/वा.क./कावि/१४६/२०१३, दिनांक ३१/०७/२०१३

विषय – पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा करणारी वाहने ओढून नेण्याची कारवाई करणे व आशा वाहनधारकाकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क वसूल करण्याचे महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये म.न.पा.चे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – २६ | विषय क्रमांक - ३

दिनांक - ०८/०८/२०१३ | विभाग – BSUP प्रकल्प

सूचक – मा.तानाजी खाडे | अनुमोदक – मा.सविता साळुंखे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/BSUP/३०७/२०१३, दिनांक ०७/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत BSUP-JnNURM अंतर्गत मिलिंदनगर, से.२२ निगडी , वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचा SRA मार्फत बांधकाम परवानगी प्राप्त आहे. संक्रमण शिबीरामध्ये स्वच्छतागृहे, गटर पाण्याची व्यवस्था, विद्युत काम इ. सुविधा मनपामार्फत मनपाचे खर्चाने पुरविलेल्या आहेत. प्रत्येक पत्राशेडमधील लाभार्थी त्यांची वैयक्तिक वीज जोडाचे (Electric Connection Meter) देयक तो स्वत:च भरत असतो. आतापर्यंत से.२२ वेताळनगर व मिलिंदनगर प्रकल्पात हीच practice गेले ५ वर्ष चालू आहे. तथापि दि.२५/०७/२०१३

च्या पत्रान्वये मिलिंदनगर येथील झोपडपट्टीधारकांनी निर्मुलन आदेशामधील अटींचा उल्लेख करुन त्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या वैयक्तिक वीज जोडाचे बील मनपाने भरावे अशी मागणी केलेली आहे. सदर प्रकल्पाच्या निर्मुलन आदेशा सोबतच्या अटींमध्ये अट क्र.२ अन्वये लाभार्थ्यांच्या तात्पुरत्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी बांधण्यात येणा-या संक्रमण शिबीरात लाईट, पाणी, सांडपाण्याची सोय, स्वच्छतागृहे आदी आवश्यक बाबींची सुविधा विकास कामे करुन द्यावयाची आहे. संक्रमण शिबीरातील सुविधा प्रित्यर्थ येणारे सर्व शुल्क विकासकाने भरणे बंधनकारक आहे. संक्रमण शिबीरात मनपा मार्फत उपरोक्त सुविधा मनपाचे खर्चाने पुरविलेल्या आहेत. विषयांकित निर्मुलन आदेशामध्ये मासिक विद्युत बील विकसकाने भरावयाचे आहे असे कोठेही नमुद नाही. तसेच सदरचा प्रकल्प BSUP-JnNURM अंतर्गत राबविण्यात येत आहे. DPR मध्ये मासिक विद्युत बिलाचा खर्च अंतर्भूत नाही त्यामुळे Transit Camp मधील वैयक्तिक विद्युत देयके लाभार्थ्यांनी अदा करावयाचे आहे अशी प्रशासनाची धारणा आहे. तरी BSUP-JnNURM अंतर्गत सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पत्राशेडमधील वैयक्तिक विद्युत देयक लाभार्थ्यांने भरावे किंवा मनपाने भरावे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ७५३ /२०१३
दिनांक - १६/०८/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.